
अजरामर गायक सायगल आणि त्यांच्या गीतांविषयी अधिक आणि सचोट माहिती मिळवायची असेल तर 'हमराज' आणि हरीश रघुवंशी यांनी तयार केलेल्या 'सायगलकोश'ची काही पानं चाळायला हरकत नाही. त्या पुस्तकाची माहिती देणारा हा लेख.



कुंदनलाल सायगल: आजही चाहत्यांच्या मनात अमर


वेदना आणि माधुर्य या दोन्हीचा अनोखा संगम असलेला गळा, बेफिकीर वृत्ती, रंकाचा राजा बनल्याच्या परीकथेचं एक जिवंत उदाहरण, कल्पनातीत यश आणि अफाट लोकप्रियतेचा धनी, अल्पायुष्य या सगळ्यांच पैलूंमधून सायगल यांचं आयुष्य एखाद्या दंतकथेसारखंच वाटतं.

आणि एखादी व्यक्ती जेव्हा दंतकथा बनून जाते त्यावेळी तिच्या विषयी उलट सुलट कथाही कानावर येतात. ४ एप्रिल, १९०४ रोज सायगल यांचा जन्म झाला. त्या दिवसापासून त्यांच्या अंतयात्रेसमयी 'जब दिल ही तूट गया...'ची धून वाजवण्यात आली होती, तोपर्यंतच्या सगळ्या गोष्टी समाजात उलट सुलट संदर्भांनी चर्चेत येतात.

पण या चर्चांमध्ये खरं किती आणि खोटं किती? त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न हरमंदिरसिंग 'हमराज' आणि हरीश रघुवंशी यांनी केलाय. त्यांच्या प्रयत्नातूनच 'जब दिल ही तूट गया' हा ग्रंथ आकारलाय.



हिंदी चित्रपट गीतांच्या पाच खंडांचं संपादन करणाऱ्या कानपूरच्या हरमंदिरसिंग 'हमराज' (hamraaz18@yahoo.com, api_: 0512-2281211) आणि मुकेश गीतकोश, गुजराती फिल्म गीतकोश तसंच 'इन्हे ना भुलाना' (विस्मरणात गेलेल्या फिल्मी हस्तींची चरित्रं) सारख्या ग्रंथांचं संपादन आणि लेखन हरिश रघुवंशी (harish_nr51@hotmail.com, api_: 0261-2225561) यांनी



अखेरच्या दिवसांत डोक्याचं टक्कल केल्यावर सायगल म्हणाले होते, 'आता मी चित्रपटांत साधू नाहीतर सन्याशांचींच भूमिका करीन.'

मिळून तयार केलेल्या या ४७२ पानी ग्रंथात सायगल यांनी गायलेल्या तमाम १८६ फिल्मी आणि बिन फिल्मी हिंदी, बंगाली, पंजाबी, तामीळ, फारसी गीतांचा समावेश करण्यात आलाय. तसंच आर.सी.बोराल, पंकज मलिक, बी.एन.सरकार, फणी मजुमदार, काननदेवी, केदार शर्मा, बाबुराव पटेल यांच्यासारख्या सायगलांच्या समकालीनांचे सायगलांविषयींचे लेख आणि अनेक दुर्मिळ छायाचित्रांचा समावेशही या ग्रंथात करण्यात आला आहे.

४ एप्रिल, २००४ रोज सायगल यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा अखेरचा दिवस होता. आजवर सायगल यांची जन्मतारीख ४ एप्रिल १९०४ अशी मानली जात होती, पण 'हमराज' आणि हरीश खुवंशी यांनी तत्कालीन पुराव्यांच्या आधारे ती ११ एप्रिल १९०४ असल्याचं सप्रमाण सिद्ध केलं आहे. सायगल यांच्या मृत्यविषयीही गैरसमज आहेत. काही जाणकारांच्या मते सायगल यांचा मृत्यू १८ जानेवारी १९४६ रोजी झाला होता. पण त्यात तथ्य नाही. त्याचं कारण असं की, १९४६मध्ये सायगल यांना *शाहजहां* आणि आपल्या कारकीर्दीतला अखेरचा चित्रपट *परवाना*चं चित्रीकरण केलं होतं. *शाहजहां*च्या आधी *परवाना* रिलीज झाल्याने अनेकांना *शाहजहां* हाच सायगल यांचा अखेरचा चित्रपट वाटतो. त्यांचा मृत्यू १८ जानेवारी १९४७ रोजी झाला होता. १९४७च्या फिल्म इंडियाच्या अंकात बाबुराव पटेल यांनी सायगल यांना दिलेली श्रद्धांजली १९४६च्या वादावर कायमचा पडदा टाकतो. त्यात बाबुराव यांनी लिहीलं होतं की, सायगल यांच्या मृत्यूच्या बातम्यांमुळे आठवडाभर वर्तमानपत्रात दंगे, राजकारण आणि पाकिस्तानविषयीच्या बातम्याही मागे टाकल्या गेल्या होत्या.

> **वेगवेगळे पदार्थ करण्यात सायगल कुशल होते. अनेकदा ते स्वत: बनवलेले पदार्थ टिफीनमध्ये भरून माझ्यासाठी मुद्दाम घेऊन येत असत.**
>
> **- पंकज मलिक**

रेडीयोवर सायगलांच्या मृत्यूची बातमी ऐकून दु:खाच्या आवेशात लता मंगेशकर यांनी आपला नवा कोरा रेडीयो जमीनीवर आपटला होता, असं लताजींनी स्वत:च एका मुलाखतीत सांगितलं होतं. सायगल जन्मशताब्दीच्या निमित्ताने मुंबईत नलिन शाह यांनी सादर केलेल्या सायगल यांच्या ऑडीयो व्हिज्युअल शोमध्ये लता मंगेशकरही आल्या होत्या. त्यावेळी टीव्ही वाहिन्यांच्या पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत त्या असंही म्हणाल्या होत्या की, लहानपणी मी सायगलशीच लग्न करणार असा हट्ट वडिलांजवळ नेहमी करत असे. गायकांना रॉयल्टीच्या प्रमाणात मानधन देण्याचा पायंडा मी इंडस्ट्रीत पाडला असं म्हणणाऱ्या लताजींचा हा दावा खोटा आहे. कारण जेव्हा इतर गायक गीतामागे जेमतेम एक रुपया कमावत होते, त्यावेळी 'हिंदुस्तान रेकॉर्ड कंपनी'चे मालक चंडीचरण सहा सायगल यांना रॉयल्टीच्या हिशोबानेच मानधन देत असत.

सायगल पैशाचे भुकेले कधीच नव्हते. त्यांची जीवनशैली अतिशय साधी होती. अनेक संगीतप्रेमी सायगल महान की पंकज मलीक? अशा निरर्थक चर्चांमध्ये आपला आणि इतरांचा वेळ फुकट घालवतात. प्रत्यक्षात हे दोघंही खास मित्र होते. त्यांच्यात व्यावसायिक स्पर्धा कधीच नव्हती. सायगल यांच्या पाककलेचं पंकजजी नेहमी कौतुक करत असत. आपल्या एका लेखात ते म्हणतात, 'वेगवेगळे पदार्थ करण्यात सायगल कुशल होते. अनेकदा ते स्वत: बनवलेले पदार्थ टिफीनमध्ये भरून माझ्यासाठी मुद्दाम घेऊन येत असत. आणि तो टिफीनही सायगलांच्या मनासारखाच भला मोठा असायचा.' सायगल यांच्याशी ज्यांची स्पर्धा असू शकते, त्या 'न्यू थिएटर्स'च्या गायक-अभिनेता पहाडी सन्याल यांनी एका लेखात सायगलांविषयी मत लिहीलं होतं. 'सहकलाकारांच्या तुलनेत स्वत:चं श्रेष्ठत्व सिद्ध करून इतरांना हीन लेखण्याचा प्रकार आम्हा कलाकारांत बरेचदा बघायला मिळतो. पण सायगल यांच्या बाबतीत

मात्र असं कधीच झालं नाही. त्यांच्या स्वभावातच ते नव्हतं. सायगल यांच्याकडे एक मोटरसायकल होती. आवड म्हणून त्यांनी ती घेतली, पण ती चालवता येत नसल्याने त्याच्यासाठी ड्रायव्हर ठेवला. आणि त्यांचा हा छंद 'न्यू थिएटर्स'मध्ये थट्टेचा विषय होत असे.

'न्यू थिएटर्स'मध्ये प्रवेश केल्यानंतर पहिल्या तीन चित्रपटांत सायगल यांनी आपलं नाव सायगल कश्मीरी असं ठेवलं होतं. चित्रपटांत येण्याआधी सायगल काय करत होते त्याविषयी नेमकी माहिती मिळत नाही. पण काही काळ रेमिंग्टन टाईपरायटर कंपनीत त्यांनी सेल्समन म्हणून काम केलं होतं. दिल्लीच्या इलेक्ट्रिसिटी विभागातही ते नोकरी करत होते. त्यांचे मोठे भाऊ रामलाल सायगल दिल्लीत असिस्टंट स्टेशन मास्टर होते. त्यांच्या ओळखीने सायगल यांना दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवरच्या ८ इलेक्ट्रिक घड्याळांच्या देखभालीची जबाबदारी सोपवण्यात आली.

सेल्समन आणि टाईम कीपरमधून सिंगिंग सुपरस्टार बनलेल्या सायगल यांच्या डोक्यात यश न जाण्याचं कदाचित हेच महत्त्वाचं कारण असावं. गायन तर त्यांच्या नसानसांत भिनलेलं होतं. प्रसिद्ध नाटककार बळवंत गार्गी यांनी एका ठिकाणी असं लिहीलं होतं की, कोणीही सायगल यांच्या गाण्याचं कौतुक सुरू केलं की ते पंजाबीत विनंती करत, 'केहडा शेर मारिया ए. गीत ई गाया ए ना, छड्डु यार'. (मी काय वाघ मारलाय? एक गीतच गायलंय ना, छोडो यार.)

ज्या सहजतेने त्यांनी यश पचवलं त्याच सहजतेने ते मद्य मात्र पचवू शकले नाहीत. अती मद्यसेवनाने त्यांची तब्येत ढासळू लागली. २६ डिसेंबर १९४६ रोजी सायगल सहकुटूंब आपल्या गावी जालंधरला गेले. तिथे पोहोचल्यावर काही दिवसांतच सायगल यांनी आपलं डोकं भादरून घेतलं होतं.

सायगल यांच्या मृत्यूच्या दोनच दिवस आधी जालंधरच्या थिएटरमध्ये *शाहजहां* रिलीज झाला होता. त्यांनी तो सिनेमा सहकुटूंब पाहिला. तसे ते क्वचितच आपले चित्रपट बघत असत. सायगल यांचे सुपुत्र मदनमोहन यांनी दिलेल्या माहितीनुसार सायगलांचे आवडते गायक उस्ताद अब्दुल करीम खां हे होते.



मस्तमौला सायगलः पैशाची हाव नाही की प्रसिद्धीचा हव्यास नाही. किंवा इतरांना मागे खेचण्याची वृत्तीही नाही...

उपचार करूनही सायगल यांचं आजारपण अटोक्यात येण्याची चिन्हं दिसत नव्हती. त्यांना मधुमेहाचा त्रास होताच. मात्र त्यांना आपलं मरण दिसलं म्हणून नाही, तर हिंदी चित्रपटसृष्टीच्या झगमगाटापासून लांब राहण्याच्या विचारांनी ते गावी आले असण्याची शक्यता अधिक दाट होती. कारण जालंधरमध्ये डोक्यावरचे केस छाटल्यानंतर ते गमतीने म्हणत, 'आता मी हिंदी चित्रपटांत साधू नाहीतर संन्याशाचीच भूमिका करेन. जेणेकरून मला गेटअपची अडचण येणार नाही.' मुंबईत पुन्हा येण्याच्या विचारांनी त्यांनी आपल्यासोबत न्यायला मिरचीचं लोणचं बनवून घेतलं होतं.' मक्याचं पीठ दळून घेतलं होतं.

"सायगल यांच्या मृत्यूच्या दोनच दिवस आधी जालंधरच्या थिएटरमध्ये शाहजहां रिलीज झाला होता. त्यांनी तो सिनेमा सहकुटूंब पाहिला. तसे ते क्वचितच आपले चित्रपट बघत असत."

पण त्यांच्या आजारपणाने पुन्हा उचल खाल्ली आणि १८ जानेवारी १९४७ रोजी सकाळीच त्यांचे प्राण पंचत्त्वात विलीन झाले. नुसत्या जालंधरमध्येच नाही तर देशभर वातावरण शोकाकूल झालं. वयाच्या पंचाहत्तरीतही त्या दिवसांतल्या नेमक्या आठवणी सांगणारे सायगल यांचे भाचे दुर्गेश महेता म्हणतात, 'त्यांच्या अंत्ययात्रेला दहा हजारापेक्षा अधिक लोक आले होते. रेडियोवर त्यांचीच गीतं वाजवली जात होती. आणि दर पाच मिनिटांनी हिंदी आणि इंग्रजीतून त्यांच्या निधनाची बातमी दिली जात होती.'

या गोष्टीला ५७ वर्ष आणि अनेक संगीत युगं(रॉक ॲण्ड रोल, डिस्को, रॅप, रिमिक्स) लोटली. तरीही सायगल यांच्या आवाजाची जादू ओसरलेली नाही. 'हमराज' आणि हरीश रघुवंशी यांच्या 'जब दिल ही टूट गया' या सायगलकोशाचं प्रकाशन ३ एप्रिल रोजी अहमदाबाद ग्रामोफोन क्लब येथे आणि ४ एप्रिल रोजी राजकोटमध्ये मधुसूदन भट्ट यांनी आणि जम्मूत सायगल संगीत सरिताच्या वतीने आयोजित करण्यात आलं. त्यावेळी आपण २००४मध्ये नसून १९४७मध्ये वावरतोय असा भास लोकांना झाला. कार्यक्रमाचं वातावरणच तसं होतं. प्रकाशन प्रसंगी पुस्तकाला मिळालेला प्रतिसाद सायगल त्यांच्या चाहत्यांच्या मनात आजही अमर असल्याचा पुरावाच देणारा ठरलं. ✯